चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

०६ मे, २०१९

☎ : 07172-264300
📠: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)

# खाकितील माणुसकिने पुन्हा दिला परीचय.

दि. ०५ एप्रिल २०१९ रोजी रविवार असल्याने पिटटीगुडा येथिल श्री. संजय कलीराम पवार हे जिल्हयाच्या ठिकाणी चंद्रपुर येथे आपल्या घरगुती कामानिमीत्य आले होते. उन्हाचा तडाखा आग ओकत होता. दुपारचे ११ वाजले असावेत उन्ह अधिकच तपत होती व अचानक संजयच्या डोळया समोर अंधारी दाटुन आली. पहिल्या वेळेस आलेली अंधारीकडे संजयने कानाडोळा केला व पुन्हा आपल्या कामाच्या पुर्ततेते कडे वळला. थोडयावेळाने पुन्हा संजय सोबत तसेच घडले व यावेळस हा झटका आधिपेक्षा काही तिव्र होता. संजय सचेत झाले व होते तिथेच क्षणभराकरीता स्तब्ध झाले. या क्षणभरात त्यांच्या डोळयासमोरून त्यांचा अख्खा संसार सरसावत गेला. उन्ही मुळे संपुर्ण रस्ता निर्मणुष्य होता व त्यात रविवार. कोणास मदत मागावे हा प्रश्न!. चोहीबाजुने मदतीकरीता संजयच्या नजरा फिरत होत्या. तेवढयात संजयच्या लक्षात आले की, या परिसरात आपण आधिसुध्दा आलेलो आहे व अवचित्य होते ते पुर्वभुत पिटटीगुडयाचे ठाणेदार पुंजरवाड. काही महिण्याअगोदरच पिटटीगुडा येथिल ठाणेदार पोउपनी श्री. पुंजरवाड यांची बदली चंद्रपुर येथे झालेली होती. तेव्हा ठाणेदार पुंजरवाड साहेबांसोबत संजय हा चंद्रपुर येथे त्यांच्या नविन घरी आलेला होता. व हे आठवुण संजयला हुरूप आला. व लगबगीने उठुन त्याने श्री. पुजंरवाड यांचे घर शोधले.

पुंजरवाड साहेबांच्या घरी गेल्यानंतर त्यांना कळाले की साहेब हे काही कामानिमीत्य घराबाहेर गेलेले आहे, तो थोडा निराश झाला व तितेथच बसला परंतु पुंजरवाड साहेबांच्या श्रीमतीनी त्याची खराब असलेली प्रकृती ओोळखली व त्यांची आस्थेने विचारपुस केली. तेव्हा त्यांना कळाले की संजयची प्रकृती ठिक नसुन त्याला तात्काळ उपचारीची गरज आहे. पुजरवाड साहेबांच्या पत्नीने संजयला घरात घेतले व त्यास साखर पाणी पाजुन लगेच त्यांच्या साहेबांना फोन केला.

स्ट्रॅाग रूम येथिल रात्र गस्त करून श्री. पुजंरवाड हे किराणा सामान आणन्या करीता बाहेर गेलेले होत. जेव्हा त्यांना फोन व्दारे माहित पडले की, कोणीतरी व्यक्ती जे की त्यांना ओळखत होते ते उन्हीमुळे अशक्त होउन मदती करीता त्यांच्या घरी आलेले आहे तेव्हा पुंजरवाड हे लगेच आपल्या घरी परत निघाले. घरी परत आल्यानंतर पुजरवाड साहेबांनी संजय ला ओळखले व काय झाले म्हणुन त्याची विचारपुस करू लागले, पुंजरवाड साहेबांसोबत बोलत असताना संजयच्या डोळयासमोर पुन्हा अंधारी आली व तिथेच कोसळला. पुंजरवाड साहेबांच्या लक्षात आले की संजयची प्रकृती ही जास्त खालावलेली आहे व क्षणाचाही विलंब न करता त्यांनी संजयला उठविले व आपल्या मोटारसायकलवर त्यास सरकारी दवाखान्यात घेउन गेले.

दवाखान्यात गेल्यानंतर डॉक्टरांनी पुंजरवाड सांहेबाना सांगीतले की संजयला उष्माघाताचा झटका आला आहे व त्यास त्वरीत उपचाराकरीता भरती करणे आवश्यक आहे. पुंजरवाड साहेबानी कागदोपत्री पुर्तता करून तात्पुरते संजयचे पालकत्व घेउन त्यास भरती केले. पुंजरवाड पिटटीगुडा

येथे ठाणेदार असल्याने तेथील लोक त्यांच्या ब—यापैकी संर्पकात होते. त्यांनी लगेच आपली सुत्रे हालावुन संजयच्या घरी निरोप धाडला की संजयला चंद्रपुर येथील सरकारी दवाखान्यात भरती करण्यात आले आहे, परंतु पिटटीगुडयावरून उलट निरोप आला की, संजयच्या एकटीच म्हातारी आई आहे व संजयची पत्नी ही मोल मजुरी करीता बाहेर गेली आहे. घरी संजय व्यतिरीक्त कर्ता पुरूष म्हणुन कोणीच नाही. पुजरवाड साहेबांव्यतीरीक्त आता संजय करीता कोणीच आधार नव्हता हे लक्षात घेउन पुंजरवाड साहेब संजय सोबत संपुर्ण दिवस थांबले व त्याच्या औषोधोपचार पुर्ण करून घेतला. सांयकाळ पर्यंत डॉक्टरांनी संजय बरा असुन त्याला आता परत घरी नेता येईल असा अभिप्राय दिला. तेव्हा पुंजरवाड साहेबांनी त्याला आपल्या घरी आणन्याची तयारी सुरू केली. परंतु संजयला त्याच्या मुला बाळाजवळ पिटटीगुडा येथे जायचे होते. परंतु संजयला एकटे पाठविण्यास पुंजरवाड सांहेबाचे मन तयार नव्हते, तेव्हा त्यांनी पिटटीगुडा येथील ठाणेदारांसोबत चर्चा केली तेव्हा पुंजरवाड साहेबाना कळाले की, पोस्टे पाटण येथील सरकारी वाहन हे कामा निमीत्य चंद्रपुर येथे आलेली आहे, पुंजरवाड साहेबांनी लगेच पाटण येथिल सरकारी गाडीसोबत संपर्क साधला व संजयला पाटणच्या गाडीमध्ये सुखरूप बसुन दिले. दरम्यान संजयसोबतच्या वार्तालाप मध्ये पुजंरवाड साहेबाच्या हे लक्षात आले होते की, संजय हा नोकरीच्या शोधात चंद्रपुर येथे आलेला होता, उर्दरनिर्वाह करीता त्याला नोकरी आवश्यक होती व सध्या तो मोठया आर्थिक हालाखालीतुन जिवन जगत होता. त्यामुळेच निरोप देताना पुजरवाड साहेबांनी त्यास सर्व औषधी सुध्दा घेउन दिल्या. संजयला सुखरूप निरोप दिल्यानंतर पुंजरवाड सांहेब आपल्या घराच्या वाटेने परत निघाले.

————————————————————————————————————————